# घोषणा

शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने **अधिव्याख्याता भौतिकशास्त्र**, शासकीय तंत्र निकेतन, शासकीय तंत्र निकेतन शिक्षक सेवा, गट अ (जाहिरात क्र. १८/२०१३) या पदासाठी मागणीपत्र आयोगास पाठविले होते. त्याअनुषंगाने आयोगाकडून संबंधित विषयाकरीता जाहिरात विज्ञापित करण्यात आली होती. सदर विषयाकरीता आयोगाकडून मुलाखतीपर्यंतचा कार्यक्रम पूर्ण झालेला आहे. दरम्यान शासनाने 'सदर पदाकरीता शिफारसी करण्यात येऊ नये 'असे कळविल्याने सदर पदाचा अंतिम निकाल प्रलंबित ठेवण्यात आला होता. आता शासनाने सदर विषयाच्या मागणीपत्रातील पदसंख्येत बदल करून सुधारीत पदसंख्या आयोगास कळविली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

| एकूण पदे | अराखीव | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | ९+४*+१☑ | ६+२* | २+१* | -- | -- | १ | -- | १ | -- |
| एकूण २७ पदांपैकी १ पद अपंग चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू याकरीता व १ पद अंधत्व व क्षीणदृष्टी याकरिता आरक्षित | | | | | | | | | |
| * उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित , ☑ खेळाडूंसाठी आरक्षित | | | | | | | | | |

शासनाने वरीलप्रमाणे कळविल्यानुसार संबंधित विषयाच्या सुधारीत पदसंख्येचे आरक्षण विचारात घेऊन सदर पदाच्या अंतिम निकालाची कार्यवाही आयोगाकडून लवकरात लवकर करण्यात येईल, याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

सं. पा. देशमुख
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण - मुंबई
दिनांक - २९ /११/२०१६